REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# इंद्रजित भालेरावाच्या कवितेतील स्त्री जाणीवा

प्रा. कदम एन.एस.
यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय तुळजापूर.




इंद्रजित भालेराव यांनी 1980 नंतरच्या कालखंडात समृद्ध काव्यलेखन केले आहे.त्याच्या कवितेतून शेतकरी कष्टकरी खेड्त माणसाचे विशेषतः गोरं गरिबांचे दैन्य दारिद्र्यातील जीवन जगणाऱ्या वास्तव जीवनाला मुखर करीत त्याची कविता प्रकट होते.आई वडील भांवडे शेती आणि शेतकरी यांच्या जीवनाच प्रामुख्याने चित्रण येते.संताचा भक्तीभाव, कष्टकऱ्यांचे दुःख, भूमी वरील श्रध्दा अशा त्यांच्या कालीन समकालीन पूर्वकालीन आशयाला आपल्या कवितेतून प्रामुख्याने ते अभिव्यक्त करतात . सुरवातीच्या कालखंडातील कवितेत पीक पाणी, शेतकरी,स्त्री जीवन या त्यांच्या अस्था- श्रध्दा प्रकट होतात.मुळात निसर्गाशी शरण जाणारे अवती भोवती चे लोक आप्तासंबंधी त्याची कविता भूमिका घेते.वास्तव रंगवणारी कधी भोळी भाबडी अशी व्यक्त होते.पुढे मातृत्वजगण्याबदल , शेतकय्राबदल विशीष्ट भूमिका घेते.टाहो फोडतं प्रकट होते.

मराठी लोककवितेला जोडणारी लोकछंदाची निर्मीती करत त्याची कविता शेती-माती, दुष्काळ,सुकाळ तुकोबा बाप माय खेडयातील उलघाल मांडते.ओवी अंभगाचा रचनाबंध सहज स्विकारून स्वाभाविकपणे अभिव्यक्त होते.त्यानी ज्या कालखंडात शेती निष्ठतेचा वसा घेतला तो कालखंड गद्‌यात्मक छंदमुक्तीचा होता.आधुनिक मराठी कवितेत ती लक्षणीय ठरली .भालेराव जाणीव पूर्वक लोकछंद पेलतात.

जो बहिणाबाई ना.धो.महानोर यांनी निसर्ग छंदाची कविता स्विकारून मानव्याचे आध्यात्म आणि वास्तव मांडते.

आकाश, माती, पाणी, उजेड, वारा याबरोबर शेतकरी ही सृष्टीचं साहवं तत्त्व मानले.(पेरा)

माय उभी पाताळात
उंच आभळा एवढी
दुष्काळात वाहणारी
नदी सुकाळा एवढी-(टाहो)

भालेरावाची कविता अनुभवातून आलेले लोकतत्वज्ञान मांडते. बहिनाबाईशी स्वताला जोडताना माणुसकीचं गाणं हिरिदाचा ठाव यातून ते संकेत देते.

माझ्या कवितेचा हात
असो ओबड धोबडं
नांगरलेल्या मातीवाणी
व्हावं काळीज उघडं-(पीकपाणी)

सौंदर्यवादी कवितेतील शब्दांची ओढ त्यांना नाही.

नक्षत्र पेरले माय
ते क्षेत्र निघाले वांझ
झंकार वाजण्याआधी
अपशकुनी फुटली सांज

मायेच्या भाषेतील श्रीमंती त्यांच्या कवितेत आहे.ते जगताशी जोडले गेले आहेत त्या जगताची भाषा योजितात.शेणा मातीचा दरवळ आपल्या कवितेला यावा ही धारणा

आहे.कुणबी खुरटा असतो तरीही पोशींदा असतो.शेती त्याचा कर्मयोग मानतात.

माझं ओलांडून प्रेत।आधी रूजविलं शेतं।
मग आला स्मशानात।काळयामाईचं गाणं गातं...

आपल्या आई बहीण यांच्या जीवनात परिस्थितीत काहीचं आपल्याने फरक पडत नाही.
त्यांच्या परिस्थितीत फरक पाडण्या सारखं काहीचं करू शकत नाही
याची खंतही आहे. त्याच्या दु:खात दैन्य दारिद्रयाच, स्त्रीच वास्तव मांडतात.
'भूमीचे मार्दव ' मधील 34 ते 42 या कविता प्रामुख्याने स्त्री जीवनाचे विविध पैलू उलगडतात.

स्त्री जीवन लोकगीतातील भावना छंद प्रतिमा यांचा वापर स्त्रीचा जन्म वयात येणं माहेर सासर ,कोवळ्या वयातले प्रेम भाव शेतकरी घरातील सुख दु:ख विरह विशीष्ट अनुभव ओव्यातून मांडतात.

जेवारीच्या लाह्या।पुरणाची पोळी
बापाजीची चोळी।वाट पाहे.
सासर माहेर चे चित्रण येते.
पुन्हा संसाराची। तुडवीत वाट
आयुष्याचा घाट।चढायचा..

मैना राबते कष्ट करते याची राघूला जाणीव आहे.घरा रानातील कष्ट तिचे। संसार उभा करते ही जाणीव त्याला आहे.

तिचे राबणारे हात
कष्टकरी दिनरात
सुख येई शिवारात
माझी मैना पाहिली का?
गोरी गोरीपान केवडयाचं रान

नागेलीच पान अशी लोभस मैना शेतामध्ये राबते.दोघाच्या संसाराला जीवनाला उभारी देते.एकूनचं स्त्रीजीवनातील दु:खाचा कैवार घेते.

लेकीचा जलम फुटणारी लाही
खाणारा म्हणतो भाजलीच नाही.
तेव्हा राख होते मनातील माय.

स्त्री ही भूमीच्या मार्दवतेचं प्रतिकरुप आहे.म्हणून तिच्या अलंकारात कुडया पाटल्या सरी पोत फूलं झूलंअसे गवताचे प्रतिक आहेत.

बहीणाबाई च सारं विश्व रानशेती होत तीच काव्यजाणीव भालेरावाची आहे.त्याच पाय वाटेने निर्मिती साधतात.

आभाळ दऊत।पावसाची साई
सज्ज झाली भूई।उफाणून
मातीच्या मनाचा ।उमटतो शब्द

कोंबासाठी स्तब्ध।अवकाश

सुलभ शब्द सामर्थ्य येते . ते परिणाम कारक बनते.ठसठशीत ध्वनी सामर्थ्य

विरोधातून उपरोध या मुळे कविता आकलन सुलभ बनते.गुतांगुतीच्या भावप्रक्षोभाला आत्मस्वराला अवरूध्द करते. व्यक्तीत्वामधून सह अनुभव व्यक्त करते कणव राग करूणा निर्माण करते.

' माय घराचे इमान
माय घराची कमान
घरादाराला पुरतो
मातीच्याच अभिमान...

आई पत्नी रूपातील स्त्री जीवनाचे चित्रण कविता अगतिकता सोशिक पणा तिच्या वाट्याला कष्ट व मरणप्राय यातनात घेऊन तिला जगावे लागते.

## संदर्भ ग्रंथ


1) सारे रान-संपादक श्रीकांत उमरीकर
2) पीकपाणी
3) आम्ही काबाडाचे धनी
4) दूर राहिलेला गाव
5) इंद्रजीत भालेकराची समग्र कविता.
6)जनशक्ती वाचक चळवळ
7) रानवारे-प्रस्तावना इत्यादी.